पुण्यनगरी
# आरोग्यजागर
| उत्तम आरोग्य | उज्ज्वल भविष्य | पुणे, मंगळवार,५ मे २०१५

# सोरीयासीसवर होमिओपॅथीद्वारे सखोल व सहज उपचार

सोरीयासीस या शब्दाचा अर्थ ग्रीक भाषेनुसार Itching Condition म्हणजेच खाज येण्याची अवस्था असा होतो. सोरीयासीस हा खूप लोकांमध्ये सहजपणे आढळणारा दीर्घ आणि पुन्हा पुन्हा होणारा आजार आहे. हा आजार जरी फक्त त्वचेवर दिसून येत असला तरी तो अंतर्गत कारणामुळे म्हणजेच प्रतिकार संस्थेतील बिघाडामुळे उद्‌भवतो.

त्वचेवर लालसर पापुद्रे उठतात व त्वचा कात टाकल्याप्रमाणे निघून जाते. शरीरावर प्रचंड प्रमाणात खाज उठते. शरीरावरील काही काही भागांवर किंवा संपूर्ण अंगावर हे व्रण दिसू शकतात.

**कारणे -**

**१. अनुवंशिकता -** घरामध्ये कोणाला सोरियासिस असेल तर तो पुढच्या पिढीत आढळून येऊ शकतो.

**२. राहणीमान -** जुनाट रोग, मानसिक तणाव, ऋतू बदल, अतिशय कोरडी त्वचा, खूप प्रमाणात मद्यपानाचे सेवन, धुम्रपान, लठ्ठपणा ही कारणे असू शकतात.

३. HIV - सोरियासिसचे प्रमाण HIV Positive पेशंटमध्ये जास्त प्रमाणात आढळून येते. याचे कारण HIV पेशंटची प्रतिकार क्षमता खूप कमी झालेली असते.

**सोरियासिसचे प्रकार -**

१. Psoriasis Vulgaris :
हा अधिक प्रमाणात आढळणारा प्रकार आहे. यामध्ये जखमा दिसून येतात. हे चट्टे केंद्रस्थानी चांदीच्या रंगासारखी, खडबडीत त्वचा असते आणि सभोवती लालसर दाह असलेली छटा दिसते.

२. Guttate Psoriasis :
यामध्ये लहान लहान थेंबाप्रमणे लालसर पुरळे दिसतात.

३. Inverse Psoriasis :
याच्या जखमा शरीराच्या फोल्डवर दिसतात. हाताच्या, पायाच्या फोल्डवर, जांघेत, कुल्ल्यांवर दिसून येतात.

४. Palmoplanter Psoriasis :
यामध्ये तळहातावर व तळपायावर भेगा पडणे, त्वचा जाडसर, रुक्ष होणे, भेगामधून रक्तप्रवाह, पू तयार होणे अशी लक्षणे दिसून येतात.

५. Eythrodemic Psoriasis :
संपूर्ण शरिराच्या त्वचेवर याचा प्रादुर्भाव होतो. अशा केसेसमध्ये शरीराला थंडी वाजून ताप येणे व हृदय निकामी होऊ शकते.

६. Psoriasis of Nail :
नखे सुद्धा त्वचेचाच भाग आहे. नखांवर खड्डे पडणे, नख वेगळे निघून येणे, नखांखालची त्वचा जाडसर होणे अशी लक्षणे दिसून येतात.

७. Psoriasis of Scalp :
केस गळणे, केसांमध्ये कोंडा होणे, खाज अशी लक्षणे दिसून येतात.

Psoriatic Arthritis
१०-३५% पेशंटमध्ये सांधेदुखीचा त्रास होतो. त्वचेवरच्या जखमा जावून सोरीयासीस सांध्यामध्ये रुपांतरीत होऊ शकतो. अशा केसमध्ये त्वचा पूर्णपणे बरी दिसते. परंतु सांधे धरले जातात. सांधे दुखणे व सुजणे अशी लक्षणे साधारणता हाताच्या व पायाच्या सांध्यांमध्ये दिसून येतात.

Mechanism :
निरोगी त्वचा ही २८ ते ३० दिवसांनी बदलली जाते. पण सोरियासिसमध्ये ही प्रक्रिया लवकरात लवकर (३ ते ५ दिवसांत) होते. यामुळे नवीन पेशींचा खच त्वचेवर जमा होऊ लागतो. ही सगळी प्रक्रिया जनुकीय बिघाडामुळे होते व त्वचा झडते.




सोरियासिस हा संसर्गजन्य आजार नाही. परंतु social Stigma निर्माण करणारा आहे.

असे पेशंट खाजेमुळे त्रस्त होतात व दर्शनी भागांवर निर्माण झालेल्या जखमांमुळे समाजात वावरताना न्यूनगंड बाळगतात. सोरीयासीस कोणालाही होऊ शकतो.

**उपचारः-**

जर हा आजार जनुकीय बिघाडामुळे उद्‌भवणारा आहे तर वरवर त्वचेवर औषधे लावून बरा होइल का? तुम्हीच विचार करा ! होमिओपॅथिक शास्त्रानुसार कुठलाही आजार हा अंतर्गत समन्वय साधणाऱ्या संस्थेतील बिघाडाशिवाय होऊ शकत नाही (Disharmony in Homoeostasis)

कारणाप्रमाणेच अचूक औषध दिले गेले तरच त्याचा उपयोग होऊ शकतो. म्हणूनच होमिओपॅथिमध्ये सोरियासिसवर कुठलेही मलम दिले जात नाही तर तो औषधांनी बरा केला जातो.

**केस :**

ही एका १२ वर्षांच्या मुलीची केस आहे. तिला २-३ महिन्यांपासून (Palmoplanter Psoriasis) चा त्रास चालू झाला. ती जेव्हा आली तेव्हा तिच्या दोन्ही हातांवर व पायांवर खोलवर भेगा पडल्या होत्या. त्वचा कडक व रोगीष्ट दिसत होती. भेगांमध्ये तीव्र वेदना व



रक्तस्त्राव होत होता. तिच्या या खेळण्याच्या वयात या आजारामुळे ती चालू शकत नव्हती.

**तक्रारी :**

**१. सोरियासिस २-३ महिन्यांपासून**

- सुरुवात डाव्या पायावर - डावा हात - संपूर्ण शरिरावर जखमांमध्ये चिरा पडणे, रक्तस्त्राव होणे व टोचल्यासारख्या वेदना होणे. तीव्र प्रमाणात खाज सुटणे, खाज इतकी तीव्र होती की हातपाय चावत असे. रात्र रात्र जागत असे; कंगव्याने खाजवत असे. खाज आणि वेदना इतक्या तीव्र होत्या की मुलीसोबत पालकही जागे राहत असे. कधी कधी खाजवून दमली की आई वडील खाजवत असे.

- रात्रीच्यावेळी व थंड वाऱ्यामुळे, हिवाळ्यात लक्षणांमध्ये वृद्धी.

- खाजवल्यावर व गरम पाण्यात, तेल लावून चोळल्यावर बरे वाटणे.

**२. बद्धकोष्ठता लहानपणापासून**

- शौचाला दोन दिवसांनी होणे. कडक होणे व जोर द्यावा लागणे.

**३. डोकेदुखी १ वर्ष**

- मस्तक रात्रीच्या वेळी दुखणे, दाबल्यासारख्या वेदना मस्तकात होणे. झोपल्यावर विश्रांती मिळणे.

**प्रकृती :-**

१. भूक सहन न होणे.
२. तिखट, आंबट व मिठाची आवड
३. तोंडातून घाण वास येणे.
४. बद्धकोष्ठतेचा जुनाट त्रास
५. रात्रीची हिवाळ्यात अंथरुणात लघवीला होणे.
६. हातावर व पायावर खूप प्रमाणात घाम येणे.
७. झोपेत दचकणे व भूतांची स्वप्न पडणे.
८. प्रकृती - थंड

**स्वभावः-**

- ती लहान असल्यामुळे स्वभावाबद्दल माहिती आईने दिली. तिचा स्वभाव चिडचिडा व हट्टी आहे. तिचे कुणाशीच पटत नाही. तिला एकही मैत्रीण नाही. राग आल्यावर ती ओरडाआरडा करते किंवा एकटीच रडते. तिच्याकडे दुर्लक्ष करुन लहान भावाकडे लक्ष दिले तर तिला राग येतो. तिला अंधाराची, भुताची भीती वाटते. सगळ्या गोष्टी तिच्या मनाप्रमाणेच झाल्या तर तिला आवडते. अभ्यासात कमी आहे. कारण लक्ष केंद्रीत करू शकत नाही. तिला डान्सची आवड आहे. एका जागेवर स्वस्थ बसत नाही. अभ्यासात गणिताची आवड परंतु लिहिताना शब्द विसरते.

**संपूर्ण व्यक्तीमत्व :-**

१. औदासिन्य
२. हट्टीपणा
३. भित्रेपणा
४. लिहिताना विसरणे
५. रात्री अंथरुणात लघवीला होणे.
६. जुनाट बद्धकोष्ठता
७. त्वचा अतिशय कोरडी, उग्र
८. त्वचेवर खोलवर भेगा पडणे.
९. खाज सुटणे.
१०. रात्रीच्या वेळी व थंड हवामानात कंड वाढणे.
११. घामाचे पिवळे डाग पडणे.
१२. डाव्या बाजूच्या तक्रारी
१३. भूक सहन न होणे.
१४. थंड प्रकृती

**उपचार :**

ती जेव्हा आली त्यावेळेस तिचे दोन्ही हात, पाय भरलेले होते. चिरांमधून रक्तस्त्राव होत होता. त्वचा अतिशय जाड, खडबडीत झाली होती.

पायांत असह्य खाज. ज्यामुळे ती पायाच्या आणि हाताच्या पंजाचा चावा घेत होती.

नखांवरही सोरियासिसची लक्षणे दिसत होती. पेचेस दिसत होते. ती ३ महिन्यांपासून स्वस्थ झोपली नव्हती. आल्यावर सर्वात प्रथम मी तिला मलम लावण्यास सक्त मनाई केली. कारण होमीओपॅथीला बाह्य उपचार कधीच मान्य नाही. ती रात्रीची थोडीफार स्वस्थ विश्रांती घेऊ लागली. तिची बद्धकोष्ठता कमी झाली. हळूहळू तिच्या जखमा भरू लागल्या, भेगांमधून रक्तप्रवाह थांबला. एका महिन्यात तिच्या चिरा नाहिशा झाल्या, खाज कमी झाली, त्वचा नितळ झाली, ३-४ महिन्यांत संपूर्ण हात - पाय निरोगी झाले. आणि पुन्हा ती आपल्या पायांवर नाचू लागली.

कुठल्याही त्वचेच्या विकारात कुठलेही मलम अथवा लेप लावल्याने तो आजार तात्पुरता बरा होतो आणि पुढे तो आजार अंतर्मुख होवून इंद्रियांमध्ये बिघाड निर्माण करू शकतो व घातक स्वरूप धारण करू शकतो. ज्याला Suppression of skin Disease असे म्हणतात. होमिओपॅथीमध्ये केवळ जिभेवर गोळ्या चघळण्यास देवून आजार बरी करण्याची पद्धत आहे.

**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७.**
**संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**

## जागतिक दमा दिनानिमित्त रॅली

**| पुणे : प्रतिनिधी**

जागतिक दमा दिनानिमित्त निरंजन सेवाभावी संस्था व सिप्ला यांच्याकडून आज (मंगळवार) पायी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली सकाळी साडेआठ वाजता शनिवार वाड्यापासून सुरू होवून पुढे लालमहल, मजूर अड्डा, अप्पा बळवंत चौक, केसरीवाडा, वर्तक उद्यान येथे रॅली समाप्त होणार आहे. या रॅलीला उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार जगात जवळपास तीन कोटी लोक सध्या दम्याचे रुग्ण आहेत. दमा हा मुलांना होणार आणि दीर्घकाळ राहणारा (क्रॉनिक) आजार आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दम्याने प्रभावित २५-३० लाख लोक केवळ एकट्या भारतात आहेत. या रॅलीला प्रमुख उपस्थिती म्हणून सचिन ताथेड तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सीआरएफ फाउंडेशनचे डॉ. नितीन अभ्यंकर हे काम पाहणार आहेत.

## ७० टक्के दम्याचे रुग्ण उपचार अपुरे करतात

**| पुणे : प्रतिनिधी**

देशात दम्याने त्रस्त असलेले रुग्ण काही महिन्यांनंतर दम्याचे औषध घेणे मधेच बंद करतात, त्यामुळे दम्याचे प्रमाण वाढते. अशा रुग्णांची संख्या ७० टक्के असून, त्यांनी दम्याचे औषध तो बरा होईपर्यंत घ्यायला हवे, असे मत रुबी हॉलचे सल्लागार डॉ. महावीर मोदी यांनी व्यक्त केले. तसेच इन्हेलेशन थेरपी ही सर्वात महत्त्वाची दमा उपचारपद्धती आज भारतात प्रतिदिन केवळ चार ते सहा रुपये किमतीत उपलब्ध आहे. त्याचा वापर करावा, असे त्यांनी सांगितले.

दम्याच्या औषधोपचारांची पूर्तता करण्याचे प्रमाण रुग्णांमध्ये अत्यंत कमी आहे. पूर्तता न करण्याचे प्रमाण सुमारे ७० टक्क्यांच्या आसपास आहे. आपल्याला दम्यावर नियंत्रण प्राप्त करायचे असेल तर आपण त्यावर उपचार करणे आवश्यक आहे.

दमा हा फुफ्फुसांचा गंभीर श्वसनाचा आजार आहे, ज्यामध्ये श्वसनमार्गात सूज येते. या सुजेमुळे



### इन्हेलेशन थेरपी दम्यावर उपयुक्त

श्वसनमार्ग छोटे होतात व फुफ्फुसे विविध आजारांसाठी धोकादायक होऊन दम्याच्या हल्ल्याचा घटक बनतात. धूळ, सर्दी, परागकण, केसाळ प्राणी आणि विषाणू, तसेच हवेतील प्रदूषक, त्याचबरोबर भावनावेग या गोष्टी दम्यासाठी धोकादायक बनतात. एखादी व्यक्ती या घटकांच्या संपर्कात आल्यावर सूज आलेल्या हवेच्या मार्गांना त्रास होतो, असे डॉ. मोदी यांनी सांगितले.

## ससूनमध्ये ढेकणांचा उपद्रव

**| पुणे : प्रतिनिधी**

वेळेवर औषध फवारणी होत नसल्यामुळे आणि स्वच्छतेच्या अभावामुळे पुण्यातील सर्वांत मोठ्या शासकीय ससून रुग्णालयात ढेकणांचे प्रमाण वाढले असून, रुग्णांच्या नातेवाइकांसह रुग्णांनाही रात्रीच्या वेळी ते चावत असल्याने त्याचा त्रास होत आहे. यामुळे ढेकणांचा उपद्रव कमी व्हावा यासाठी या इमारतीच्या प्रत्येक वॉर्डमध्ये औषध फवारणी करण्याची मागणी रुग्णांच्या नातेवाइकांनी केली आहे.

राज्य सरकारकडून चालवल्या



जाणाऱ्या १२९६ बेड असलेल्या ससून हॉस्पिटलमध्ये विविध आजारांवर इलाज करणारे ५४ वेगवेगळे वॉर्ड आहेत

. त्यातील बहुतांश वॉर्ड हे दगडी इमारतीचे असून, जिन्याच्या ठिकाणी आणि इतर ठिकाणी लाकडांचाही वापर करण्यात आला आहे. या लाकडांच्या फटींमध्ये ढेकणांचे वास्तव्य दिसून येते. तसेच रुग्णांच्या नातेवाइकांसाठी असलेल्या वेटिंग रूममध्ये या ढेकणांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

जेवणाच्या डब्यात ढेकूण

'आम्ही गावाकडून जेवणाचा डबा घेऊन येतो. हा डबा जर ससून रुग्णालयातील एखाद्या वॉर्डमध्ये ठेवला तर भाकरी आणि भाजीमध्ये हे ढेकूण जाऊन बसतात, परंतु नाइलाजाने हे जेवण करावे लागत आहे. तसेच पाणी पिण्याचे ग्लास, ताट आणि रुग्णांसाठी असलेली फळे यामधूनही हे ढेकूण फिरत आहे.




## आला उन्हाळा...चमकीवातापासून स्वतःला सांभाळा

**| पुणे : प्रतिनिधी**

उन्हाळ्यात पाणी कमी पिल्याने गाऊट म्हणजेच चमकीवात होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घेवून जास्तीत जास्त पाणी प्यावे, असे आवाहन पुण्यातील डॉ. सत्यशिल नाईक यांनी केले आहे.

उन्हाळ्यात शरिरात सर्वाधिक पाण्याची गरज असते. पाणी कमी पिल्याने रक्तातील युरिक ॲसिडचे प्रमाण वाढते आणि त्यामुळे रुग्णांच्या पायाचे अंगठे सुजतात. ते जास्त प्रमाणात दुखू लागतात. कधी गुडघे तर कधी पाठदुखीचाही त्रास होतो. शरिरात वाढलेले युरिक ॲसिड बाहेर पडत नाही ते शरिरातच साठून राहते. मात्र त्याचे बारीक कण हे हाडांच्या सांध्यात जावून सांधेदुखीचा त्रास सुरू होतो. या आजारात अचानक वेदना होतात. पहिल्या बारा तासात ठसठस होते, चमकते. त्यामुळे त्यास चमकीवात असे म्हणतात. हा आजार पाणी कमी पिण्याबरोबरच मद्यपान, मटण व जास्त प्रथीनयुक्त आहार घेतल्याने होतो. याचे प्रमाण महिलांपेक्षा पुरुषांमध्ये जास्त प्रमाणात असते. बदलती जीवनशैली, आहार, अनुवंशिकता, स्थूलता यामुळेही हा आजार होतो. त्यामुळे नागरिकांनी युरिक ॲसिडची



तपासणी करावी, असे आवाहनही डॉ. सत्यशिल नाईक यांनी केले आहे.

मानसिक ताण, डाएटिंग व जास्त प्रथीनयुक्त आहार, पाणी कमी पिणे, सवय नसताना जास्त प्रमाणात केलेले व्यायाम, मद्यपान, जास्त प्रमाणात मटन खाल्याने शरिरातील युरिक ॲसिड वाढते.

हे खावे : गहू, ज्वारी, बाजरी, मका, तांदूळ, दूध, दही, ताक, सर्व प्रकारची फळे, तर भाज्यांमध्ये तोंडली, दोडका, भेंडी, कोबी, फ्लॉवर, लाल भोपळा, दुधी भोपळा, सिमला मिरची, वांगी, ढेमसे, पडवळ, पापडी, गवार, शेवगा, कारले, काकडी, गाजर, मुळा, आळू आदी भाज्या खाणे आरोग्यास हितकारक आहे.

**प्रत्येक आजार झाल्यानंतर काळजी घेण्यापेक्षा तो होऊ नये म्हणून काळजी घेतली तरच आगामी काळात आपण निरोगी राहू शकतो. उन्हाळ्यात शरिरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे शरिरातील युरिक ॲसिड वाढते आणि माणूस चमकीवाताने ग्रासतो.**



**- डॉ. सत्यशिल नाईक**

## कॅन्टोमेंटमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**| पुणे :** पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघ प्रभाग २२ च्या वतीने महिला व पुरुषांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ३०० नागरिकांच्या हिमोग्लोबिन व अन्य तपासण्या करण्यात आल्या. हा कार्यक्रम ताडीवाला रोडवरील सरस्वती हाउसिंग सोसायटी येथे झाला.

याप्रसंगी शहर संघटक अजय भोसले, संजय मोरे, राधिका हरिश्‍चंद्रे, रोहिणी कोल्हाळ, पद्मा सोरटे, कविता सोनवणे, जावेद खान, उत्तम भुजबळ, उदय घोलप, कन्हैय्या संघेलिया, डॉ. रवींद्र चौगुले, वीरेंद्र गायकवाड, संतोष सोनवणे, विजय नायर, सनी गवते, गणेश लडकत, नरेंद्र दरोडे, विनोद शिंदे, सुनील जगताप, अक्षय लासुरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रभागप्रमुख विनायक नाईक आणि गौरव शिंदे यांनी केले होते.

## आपलं व्यासपीठ

### पाणी प्रश्न सोडविणे सरकारसमोर आव्हान



राज्यात सध्या तापमानाचा पारा चढू लागला आहे. नेहमीप्रमाणे यावेळी देखील राज्यामध्ये पाणीटंचाई तीव्र बनत चालली आहे. पावसाला अद्याप महिना बाकी असताना सर्व जिल्ह्यांमध्ये टँकर धावू लागले आहेत. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून अनेक जिल्ह्यातील गावे आणि वाड्यावस्त्यांवर टँकरने पाणीपुरवठा होवू लागला आहे. एका महिन्यातच टँकर्सची संख्या दुप्पट झाली असून मार्च महिन्यामध्ये सुमारे साडे पाचशे असलेली टँकर्सची संख्या ३१ मार्चपर्यंत एका महिन्यातच ११०० वर गेली आहे. मात्र राज्यातला पाणीप्रश्न सोडविणे सरकारपुढे मोठे आव्हान आहे.

**विशाला घोडेस्वार, पिंपळे सौदागर**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

**चित्रपटसृष्टीतील सर्वात महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके पुरस्कारांचे रविवारी दिल्ली येथे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यावर्षीचे अनेक पुरस्कार मराठी चित्रपटांना मिळाले आहेत. त्यामुळे मराठी सिनेमा आता देशपातळीवरही बाजी मारत आहे. तरुणवर्ग मराठी सिनेमांनाच पसंती देत आहे. या पुरस्कारांबाबत तरुणांच्या या प्रतिक्रिया...**

यूथ Talkers
सनील गाडेकर

### सुवर्णकमळ मिळवून देणारे सुवर्णक्षण

देऊळ या मराठी चित्रपटाने २०१२ मध्ये सुवर्णकमळ पटकावले होते. त्यानंतर तीन वर्षांनी हे भाग्य कोर्ट या चित्रपटाने पुन्हा एकदा मराठी चित्रपटसृष्टीला मिळवून दिले आहे. सुवर्णकमळ मिळविणारे हे दोनही चित्रपट मराठी सिनेसृष्टीतील सुवर्णक्षण आहेत. इतर चित्रपटांनीही मोठी कामगिरी केली आहे.



**कृष्णा जाधव**

### सर्वाधिक पुरस्कार

चैतन्य ताम्हाणे दिग्दर्शित मराठी चित्रपट कोर्ट या चित्रपटाला सुवर्णकमळाचा बहुमान मिळाला आहे. अन्य सहा पुरस्कारांवरही मराठी चित्रपटांनी आपली मोहोर उमटवली आहे. राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये यावर्षी सर्वाधिक पुरस्कार मिळवत मराठी चित्रपटांनी बाजी मारली आहे. त्यामुळे मराठी रसिकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. त्या पूर्ण करण्याची ताकदही आपल्या दिग्दर्शकांमध्ये आहे.



**ऋतुराज देशमुख**

### ग्रामीण भागातील दिग्दर्शकही चमकले

श्रीगोंदा येथील भाऊ कऱ्हाडे यांच्या ख्वाडाने दोन पुरस्कार मिळवून नगरचे नाव राष्ट्रीय पातळीवर नेले आहे. ख्वाडा चित्रपटामध्ये समाजातील भटक्या समुदायाच्या कठीण समस्यांची मांडणी उत्तम रीतीने केल्याने दिग्दर्शनासाठी स्पेशल ज्युरी ॲवॉर्ड प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे सिनेमांचे दिग्दर्शक फक्त शहरापुरते मर्यादित न राहता खेड्यापाड्यातही ही कला जाऊन पोहोचली आहे आणि तेही राष्ट्रीय पुरस्कार मिळवू शकतात हे या पुरस्कारांतून सिद्ध होते.



**अमोल चिवटे**